| MHRG100008132025 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०६/१०/२०२५ | | |
| | नोंदणी तारीख | : | ०६/१०/२०२५ | | |
| | निकाल तारीख | : | ०७/०८/२०२६ | | |
| | कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | | ०० | १० | ०१ |

# प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : श्री. यु. एम. जाधव)

| नियमित फौजदारी खटला क्रमांक १५५/२०२५ | निशाणी क्रमांक २४/ब |
|---|---|
| प्रथम खबर क्रमांक | ४८/२०२५ |
| अहवाल/गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | पोलादपुर पोलीस ठाणे, ता. पोलादपुर, जि. रायगड |
| निकालाचा दिनांक | ०७/०८/२०२६ |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे,पोलादपुर पोलीस ठाणे |
| अभियोगपक्षातर्फे वकील | श्री. के. व्ही. कदम, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **१. नागेश गंगाराम शिंदे,**<br>वय – ३८ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>**२. सचिन गोविंद गोळे,**<br>वय – ४१ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>**३. महादेव उर्फ विकास कृष्णा शिंदे (मयत)**<br>सर्व आरोपी रा. तुर्भे बुद्रुक, ता. पोलादपुर, जि. रायगड. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. एस. एस. सर्कले |

## भाग 'ब'

## [फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०२/०९/२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | ०३/०९/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०६/१०/२०२५ |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | ०८/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०१/०७/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | ०७/०८/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | निरंक |

**आरोपींचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागेश गंगाराम शिंदे | भा.ना.सु.सं, २०२३ चे क.३५(३) अन्वये नोटीस | ०८/१२/२०२५ | भा. न्या. सं., चे क. ११८(१), ११५(२) सह ३(५) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | सचिन गोविंद गोळे | भा.ना.सु.सं, २०२३ चे क.३५(३) अन्वये नोटीस | ०८/१२/२०२५ | भा. न्या. सं., चे क. ११८(१), ११५(२) सह ३(५) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | महादेव उर्फ विकास कृष्णा शिंदे | भा.ना.सु.सं, २०२३ चे क. ३५(३) अन्वये नोटीस | ०८/१२/२०२५ | भा. न्या. सं., चे क. ११८(१), ११५(२) सह ३(५) | खटला अबेट | निरंक | निरंक |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | मनोज विठोबा शिबुगडे | १७ | फिर्यादी |
| २. | शुभम मनोज शिबुगडे | २० | साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | दोषारोपपत्र | १ |
| २. | दिनांक ०३/०९/२०२५ रोजीची फिर्याद | १८ |
| ३. | दिनांक ०३/०९/२०२५ रोजीचा प्रथम खबरी अहवाल. | १९ |

**ब. बचाव पक्ष –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमालाचे वर्णन –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| १. | निरंक | मेलामाईन प्लेट (डिनर प्लेट) |

# न्या य नि र्ण य

## (दिनांक माहे ०७ ऑगस्ट, २०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला हा आरोपी क्रमांक १ ते ३ विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. परंतु, खटला प्रलंबित असताना आरोपी क्रमांक ३ हा मयत झाल्याने त्याच्या विरूध्द खटला अबेट झाला आहे आणि प्रस्तुतचा खटला हा केवळ आरोपी क्रमांक १ व २ यांचेविरुद्ध संपरीक्षित करणेत आला. सबब, आरोपीं विरुध्द निश्चित करण्यात आलेल्या भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) खालील दोषारोप सिध्दतेकरीता प्रस्तुत संपरीक्षा आहे.

## अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

२. दिनांक ०२/०९/२०२५ रोजी २३.३० वाजताचे दरम्यान मौजे पार्ले गावचे हद्दीत, मुंबई-गोवा हायवे रोडसमोरील मनस्वाद हॉटेलमध्ये, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपी क्रमांक १ व २ यांनी मयत आरोपी क्रमांक ३ यांच्याशी आपसात संगनमत करून, फिर्यादीने जेवण थोडा वेळाने देतो असे सांगितल्याने त्या गोष्टीचा राग मनात धरून आरोपी क्रमांक १ याने फिर्यादीच्या कानाखाली मारली, तसेच आरोपी क्रमांक २ याने साक्षीदार यांचे उजवे डोळयाचे वरील बाजुस व हातावर प्लेट मारून दुखापत केली, तसेच मयत आरोपी क्रमांक ३ याने साक्षीदार याच्या पोटावर लाथ मारली. म्हणुन फिर्यादीने पोलादपुर पोलीस ठाणे येथे आरोपीं विरूध्द फिर्याद दाखल केली. आरोपीं विरुध्द सदर प्रकरणात गुन्हा क्रमांक ४८/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) अन्वये नोंदविण्यात आला.

३. पोलीसांनी तपासादरम्यान पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा, जप्ती पंचनामा व अटक पंचनामा तयार केला. तक्रारदार व इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपी विरुध्द पुरेसा पुरावा आढळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपीं क्रमांक १ व २ विरुध्द निशाणी क्रमांक १० वर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) अन्वये दोषारोप निश्चित केला. आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून दाखविले व समजुन सांगितले. आरोपींनी निश्चित केलेले दोषारोप अमान्य केले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोगपक्षाच्या पुराव्यातुन साक्षीदारांचे निवेदन नोंदविण्याइतपत पुरावा आल्याने आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा अधिनियम, २०२३ चे कलम ३५१ अन्वये निवेदन निशाणी क्रमांक २२ व २३ वर नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्यांनी खोटी केस दाखल केली असा बचाव घेतला.

५. अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुरावा तसेच, दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेता, पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आले, त्यावर निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ०२/०९/२०२५ रोजी २३.३० वाजणेचे सुमारास मौजे पार्लेवाडी, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपी क्रमांक १ व २ यांनी मयत आरोपी क्रमांक ३ शी संगनमत करून, साक्षीदार शुभम याला ॲल्युमिनिअमच्या प्लेटने मारहाण करून दुखापत होण्यास कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्रमांक १ व २ यांनी मयत आरोपी क्रमांक ३ शी संगनमत करून, फिर्यादी यांना हाताबुक्क्यांनी मारहाण करून त्यांच्या दुखापतीस कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२) सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | अंतिम आदेश काय ? | **..आरोपींची निर्दोष मुक्तता** |

# कारणमिमांसा

## मुद्दे क्रमांक १ व २ बाबत :-

६. मुद्दे क्रमांक १ व २ हे एकाच घटनेचा भाग असुन त्या अनुषंगाने आलेला पुरावा हा एकत्रीत असल्याने सर्व मुद्दे हे कारणमिमांसेकरिता एकत्रीत विचाराधीन घेण्यात येत आहेत.

७. अभियोगपक्षाने शंकेच्या पलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे की, दिनांक ०२/०९/२०२५ रोजी २३.३० वाजताचे दरम्यान मौजे पार्ले गावचे हद्दीत,

मुंबई–गोवा हायवे रोडसमोरील मनस्वाद हॉटेलमध्ये, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपी क्रमांक १ व २ यांनी मयत आरोपी क्रमांक ३ यांच्याशी आपसात संगनमत करून, फिर्यादीने जेवण थोडा वेळाने देतो असे सांगितल्याने त्या गोष्टीचा राग मनात धरून आरोपी क्रमांक १ याने फिर्यादीच्या कानाखाली मारली तसेच आरोपी क्रमांक २ याने साक्षीदार यांचे उजवे डोळयाचे वरील बाजुस व हातावर प्लेट मारून दुखापत केली, तसेच मयत आरोपी क्रमांक ३ याने साक्षीदार याच्या पोटावर लाथ मारली.

८. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ मनोज हा फिर्यादी असुन त्याला घटनेमध्ये मारहाण झाली होती. त्याने असे साक्षकथन केले की, घटना किती तारखेला घडली हे त्यांना आठवत नाही. आरोपी नागेश शिंदे हे त्यांच्या हॉटेलमध्ये जेवायला आले होते. त्यांना जेवण पुरवायला १५ ते २० मिनिटे लेट झाले. त्यामुळे आरोपीने उठुन त्यांच्या कानाखाली मारली. मुलीला एक लाथ मारली. मुलाला हाताला व डोक्याला मारले. त्यानंतर ते पोलीस स्टेशनला गेले. त्यांच्या साक्षीतुन अभियोगपक्षाने फिर्याद निशाणी क्रमांक १८ व प्रथम खबरी अहवाल निशाणी क्रमांक १९ शाबीत करून घेतली.

९. उलटतपासादरम्यान साक्षीदार मान्य करतो की, घटनेवेळी मध्यरात्र होती. गर्दी असेल तर ऑर्डर दयायला अर्धा ते पाउण तास लागतो. घटनेच्या दिवशी गडबड सुरू होती. त्यामुळे त्यांची थोडीशी चिडचिड सुरू होती. त्यांनी पुढे असेही मान्य केले की, घटनेदिवशी आरोपींच्या टेबलला ऑर्डर पोहचविण्यात आली नव्हती व उशीर झाल्यामुळे आरोपींनी ऑर्डरला उशीर का झाला असे विचारले होते. फिर्यादीने पुढील उलटतपासादरम्यान मान्य केले की, त्यांची आरोपीं विरूध्द कोणतीही तक्रार राहिलेली नाही. तसेच, त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली आहे. साक्षीदाराने पुढे स्पष्टपणे मान्य केले की, त्याने रागाच्या भरात आरोपी विरूध्द तक्रार दिली होती व सध्या आरोपी विरूध्द त्यांचा

कोणताही राग नाही व त्यामुळे त्यांनी आरोपी सोबत तडजोड केली आहे. त्यामुळे त्यांना प्रस्तुत प्रकरणी इतर कोणताही पुरावा दयायचा नाही.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ शुभम हा फिर्यादीचा मुलगा असुन त्यालाही घटनेमध्ये मारहाण झाली होती. त्याने असे साक्षकथन केले की, घटना किती तारखेला घडली हे त्याला माहित नाही. गणपती विसर्जन झाल्यानंतर ते हॉटेलला गेले, त्यावेळी कस्टमर फुल होते. त्यामुळे भांडणामध्ये चेहरा कोणाचा लक्षात आला नाही. साक्षीदाराला बाहेरून आरोपीचे नाव समजले. कोणी कोणाला मारहाण केली होती, हे त्यांना आठवत नाही. ज्यांनी त्यांना मारहाण केली त्यांना साक्षीदार ओळखु शकत नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार हा त्याचे पुर्वीच्या जबाबाच्या विपरीत साक्ष देत असल्याने व सरकार पक्षास सहाय्य करत नसल्याचे कथन करून भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १५७ नुसार साक्षीदारास उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तसेच, भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १४८ मध्ये नमुद केले प्रमाणे साक्षीदाराच्या सरतपासाचे खंडन करण्यासाठी प्रश्न उत्तराचे स्वरूपात पुढील सरतपास घेणेस भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १८१ (१) नुसार सुध्दा परवानगी मागितली. तशी परवानगी देण्यात आली.

**११.** उत्तरसुचक सरतपासादरम्यान साक्षीदाराने मान्य केले की, हॉटेलमध्ये गर्दी असल्याने वडिलांनी थोडया वेळाने ऑर्डर देतो असे सांगितले. साक्षीदार अमान्य करतो की, एका कस्टमरने वडिलांच्या कानाखाली मारली व त्यांच्या डोळयाजवळ प्लेट मारली. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान साक्षीदार मान्य करतो की, दिनांक ०३/०९/२०२५ रोजी कोणीतरी त्यांच्या हॉटेलमध्ये गोंधळ घातला होता, परंतु तो गोंधळ आरोपींनी घातला नव्हता. अनोळखी लोकांनी हॉटेलमध्ये गोंधळ घातल्यामुळे ते फिर्याद दयायला गेले होते. साक्षीदाराने पुढे स्पष्टपणे मान्य केले की, त्यांना आरोपींची नावे इतर व्यक्तीकडुन समजली व

हॉटेलमध्ये गोंधळ झाल्याच्या रागापोटी त्यांच्या विरूध्द तक्रार दिली आहे. तसेच, आरोपी व त्यांच्यामध्ये या कारणाने तडजोड झाली आहे की, आरोपी हे घटनेच्या वेळी त्यांच्या हॉटेलमध्ये उपस्थित नव्हते. प्रस्तुतचा खटला त्यांना पुढे गतीशील करायचा नाही. प्रस्तुत प्रकरणी इतर कोणाताही साक्षीदार आम्हाला तपासायचा नसुन इतर कोणालाही तपासायचे नाही. त्यांच्यावर तडजोड करण्यासाठी कोणाचाही दबाव नाही.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ हे अत्यंत महत्वाचे साक्षीदार असुन त्यांनी आरोपींनी त्यांना मारहाण करून शिवीगाळ करून जखमी केल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. जरी साक्षीदार क्रमांक १ याने त्यांना मारहाण झाल्याचे साक्षकथन केले असले तरी साक्षीदार क्रमांक २ यांनी त्यांच्या साक्षीस बळकटी आणलेली नाही. साक्षीदार क्रमांक १ व २ हे वडील व मुलगा असे नातेसंबंधाने आहेत. परंतु, त्यांच्या साक्षींमध्ये कमालीची तफावत दिसुन येते. जर साक्षीदार क्रमांक १ व २ यांना एकाच वेळेला आरोपींकडुन मारहाण झाली असेल तर तसे त्यांनी साक्षकथन करणे अपेक्षित होते, परंतु ते दोघे परस्पर विरोधी साक्ष देत आहेत. इतर कोणतेही साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत, कारण प्रकरण हे न्यायालयाबाहेर आरोपी व साक्षीदार क्रमांक १ व २ यांच्यामध्ये तडजोडीने संपुष्टात आलेले आहे. त्यांच्या पुराव्यादरम्यान शिवीगाळ व फौजदारीपात्र धाकटपदशा केल्याबाबत कोणतेही शब्द अभिलेखावर आलेले नाही. प्रमुख पुरावा अभियोगपक्षाच्या बाजुने नसल्याने दुय्यम पुरावा प्रस्तुत प्रकरणी अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेले नाही.

**१३.** याशिवाय फिर्यादीने निशाणी क्रमांक २१ वर पुरशीस दाखल करून, त्यांना खटला पुढे संपरिक्षीत करायचा नाही असे कथन केले आहे. त्यामुळे सरतेशेवटी, निशाणी क्र. १ वर आदेश करून, अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीतुन दोषारोपातील

कलमांची तात्वीक अंगे सिध्द होतील असा कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही, कारण अभियोगपक्षातर्फे फिर्यादी व साक्षीदाराला आरोपींनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचे नाकारले आहे. त्यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता, त्यांची साक्ष ही विश्वासार्ह दिसुन येत नाही. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीतुन आरोपीं विरूध्द शंकेच्या पलीकडे आरोपीने गुन्हा केल्याचे दिसुन येत नाही. वरील सर्व उहापोहाचा साकल्याने विचार केला असता, घटनेमध्ये शंका उत्पन्न होते.

**१४.** वरील सर्व कारणमिमांसेवरून, दिनांक ०२/०९/२०२५ रोजी २३.३० वाजताचे दरम्यान मौजे पार्ले गावचे हद्दीत, मुंबई–गोवा हायवे रोडसमोरील मनस्वाद हॉटेलमध्ये, ता. पोलादपुर, जि. रायगड येथे आरोपी क्रमांक १ व २ यांनी मयत आरोपी क्रमांक ३ यांच्याशी आपसात संगनमत करून, फिर्यादीने जेवण थोडा वेळाने देतो असे सांगितल्याने त्या गोष्टीचा राग मनात धरून आरोपी क्रमांक १ याने फिर्यादीच्या कानाखाली मारली तसेच आरोपी क्रमांक २ याने साक्षीदार यांचे उजवे डोळयाचे वरील बाजुस व हातावर प्लेट मारून दुखापत केली, तसेच मयत आरोपी क्रमांक ३ याने साक्षीदार याच्या पोटावर लाथ मारली, हे शंकेच्या पलीकडे सिध्द झाले नसल्याने शंकेचा फायदा देवुन आरोपीस निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त होईल. सबब, मुद्दे क्रमांक १ व २ यांना 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

## <u>मुद्दा क्रमांक ३ करीता</u> :–

**१५.** मुद्दे क्रमांक १ व २ बाबत नकारार्थी अभिप्राय नोंदविला असल्यामुळे अभियोगपक्षाने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) अन्वये खालील शिक्षापात्र अपराध शाबीत केलेला नाही. परंतु, संपरिक्षेदरम्यान आरोपी क्रमांक ३ हा मयत झाल्याने त्याच्या विरूध्द खटला अबेट झाला आहे. त्यामुळे आरोपी क्रमांक १ व २ यांची वरील अपराधातून निर्दोष मुक्त करणे संयुक्तीक होईल.

**१६.** प्रस्तुत प्रकरणातील विस्तृतपणे दोषारोपात वर्णन केल्याप्रमाणे जप्त

मुद्देमाल मेलामाईन प्लेटचे तुकडे (डिनर प्लेट) हे मुल्यहीन व निरूपयोगी असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर त्या नाश करणे किंवा त्यांची योग्य ती विल्हेवाट लावणे उचीत होईल.

**१७.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीं क्रमांक १ व २ यांनी यापुर्वी प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले वैयक्तिक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामीन कदबा पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कायम करणे उचीत ठरेल. सबब, मुद्दा क्रमांक ३ चे उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी क्रमांक १ व २ यांना भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) खालील दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. आरोपी क्रमांक ३ विरूध्द खटला अबेट करण्यात आला आहे. |
| **२.** | प्रस्तुत प्रकरणातील विस्तृतपणे दोषारोपात वर्णन केल्याप्रमाणे जप्त मुद्देमाल मेलामाईन प्लेटचे तुकडे (डिनर प्लेट) हे मुल्यहीन व निरूपयोगी असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर तो नाश करण्यात यावा किंवा त्यांची योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी. |
| **३.** | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीं क्रमांक १ व २ यांनी यापुर्वी प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले रक्कम रू. १५,०००/- वैयक्तीक जातमुचलके व तितक्याच रकमेचा जामीन कदबे केवळ पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कायम करण्यात येत आहेत. |
| *(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)* | |

JADHAV UDAY MAHADEV

Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV Date: 2026.08.07 17:46:26 +0530

महाड,
दिनांक : ०७/०८/२०२६.

(यु. एम. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड.

I affirm that the contents of this P. D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav,<br>2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Name of Stenographer | :- | Mr. B. T. Deshmukh |
| Date of decision / typed | :- | 07/08/2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 07/08/2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 07/08/2026 |